# महाराष्ट्र - शासन

सार्वजनिक बांधकाम विभाग,
दक्षता व गुणनियंत्रण मंडळ (सा.बां.), नागपुर

अंतर्गत

प्रादेशिक प्रयोगशाळा (सा.बां.) नागपुर

# नागरिकांची सनद

# सुची


| अ.क्र. | तपशिल | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | प्रस्तावना | १ |
| २ | बांधिलकी व नागरीकांची जबाबदारी | २ |
| ३ | प्रादेशिक प्रयोगशाळा (सा.बां.) नागपुर - रचना व कार्यपध्दती | ३ |
| ४ | कार्यपूर्तीचे वेळापत्रक, माहितीची सुलभता | ४ |
| ५ | सनदेचा आढावा, सनदेची अंमलबजावणी व प्रतिसाद | ५ |
| ६ | परिशिष्ट "अ" | ६ |
| ७ | परिशिष्ट "ब" | ७ |

# प्रस्तावना

महाराष्ट्र शासन सा.बां. प्रादेशिक विभाग, नागपुर अंतर्गत दक्षता व गुणनियंत्रण मंडळ (सा.बां.) नागपुर या कार्यालयाचे अधिनस्त असलेली प्रादेशिक प्रयोगशाळा (सा.बां.) नागपुर ही प्रयोगशाळा सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.१, परिसर रेसीडेन्सी रोड, सदर, नागपुर येथे कार्यरत आहे.

अधीक्षक अभियंता, दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, नागपुर यांच्या नियंत्रणाखाली कार्यरत असलेल्या या प्रयोगशाळेत क्षेत्रिय कार्यालयांनी सादर केलेल्या विविध बांधकाम साहित्यांच्या बांधकाम प्रशिक्षित तंत्रकुशल मनुष्यबळाद्वारे प्रचलित मानकांनुसार गुणवत्ता चांचण्या केल्या जातात.

या प्रयोगशाळेद्वारे सा.बां. मंडळ, नागपुर यांच्या मंडळ कार्यकक्षेत येणा-या क्षेत्रीय कार्यालयांमार्फत करण्यात येणा-या बांधकामांची अधीक्षक अभियंता, दक्षता व गुणनियंत्रण मंडळ (सा.बां.), नागपुर यांचे मार्गदर्शनाखाली तांत्रिक लेखापरीक्षण, क्षेत्रीय चाचण्यांची पूर्नविलोकन, कामांची दर्जा तपासणी, या बाबीं अन्वये गुणवत्ता तपासणी करुन अहवाल मंडळ कार्यालयास सादर केले जातात.

या प्रयोगशाळेत नागरिकांनी दाखल केलेल्या गा-हाणी/तक्रारी यांची त्वरीत दखल घेऊन विहीत कालावधीत त्यांचा निपटारा केला जातो. माहीतीचा अधिकार अधिनियम-२००५ अंतर्गत अर्जदारांनी मागीतलेली माहिती विनाविलंब विहीत मुदतीत उपलब्ध करुन दिल्या जाते.

अशा प्रकारे बांधकाम साहित्यांच्या चांचण्या करुन विहीत कालावधीत चांचणी अहवाल निर्गमित करणे, क्षेत्रीय कामांची तपासणी करुन बांधकामांची गुणवत्ता राखणे, माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ ची प्रभावी अंमलबजावणी करणे, इत्यादी बाबींसह नागरीकांशी बांधिलकी जपण्यास ही प्रयोगशाळा कटीबध्द आहे.

# बांधिलकी व नागरीकांची जबाबदारी

## अ) प्रादेशिक प्रयोगशाळेची बांधिलकी

१) नागरिकाशी सौजन्यपूर्ण वागणुक करणे.

२) कामाचा निर्धारित वेळेत निपटारा करणे व कामात पारदर्शकता राखणे.

३) चांचण्यांची अचुकता व गुणवत्ता राखण्यास सर्वतोपरी प्रयत्न करणे.

## ब) नागरिकांची जबाबदारी

१) प्रयोगशाळेत कामासाठी / माहिती घेण्यासाठी येणा-या प्रत्येक नागरीकांची वर्तणुक कार्यालयातील अधिकारी / कर्मचारी यांचेशी सौजन्यपूर्वक असावी.

२) अधिकारी / कर्मचारी यांनी आवश्यक कार्यवाहीसाठी मागविलेल्या माहीतीस नागरीकांनी योग्य ती प्रतिसाद दयावा.

# प्रादेशिक प्रयोगशाळा (सा.बां.), नागपुर
# रचना व कार्यपध्दती

**अ) रचना** - सा.बां. विभागात शासनस्तरावर मुख्य अभियंता व सहसचिव तसेच क्षेत्रिय स्तरावर मुख्य अभियंता, सा.बां. प्रादेशिक विभाग, नागपुर अंतर्गत अधीक्षक अभियंता, दक्षता व गुणनियंत्रण मंडळ (सा.बां.), नागपुर यांचे नियंत्रणाखाली क्षेत्रीय कामांचा दर्जा व गुणवत्ता राखण्यासाठी या प्रयोगशाळेची रचना केलेली आहे. अधीक्षक अभियंता यांचे अधिपत्याखाली याबाबत परिशिष्ट "अ" मध्ये ट्री – चार्ट दिलेला आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | सहाय्यक संशोधन अधिकारी | १ |
| २. | शाखा अभियंता / सहाय्यक अभियंता श्रेणी-२ | २ |
| ३. | संशोधन सहाय्यक | २ |
| ४. | प्रयोगशाळा सहाय्यक | १ |
| ५. | प्रयोगशाळा परिचर | १ |
| ६. | कनिष्ठ लिपीक | १ |
| ७. | शिपाई | १ |
| ८. | चौकीदार | १ |

**ब) कार्यपध्दती** - १) क्षेत्रीय कार्यालयांनी चांचण्यासाठी/तपासणीसाठी सादर केलेल्या बांधकाम साहित्यांच्या प्रचलित मानकांनुसार गुणवत्ता चांचण्या करणे व विहीत कालावधीत विनाविलंब संबंधितास चांचणी अहवाल निर्गमित करणे.

२) क्षेत्रीय कार्यालयांमार्फत करण्यात येणा-या बांधकामांची अधीक्षक अभियंता, दक्षता व गुणनियंत्रण मंडळ (सा.बां.) नागपूर यांच्या मार्गदर्शन व आदेशान्वये तांत्रिक लेखापरिक्षण, कामांची दर्जा तपासणी, क्षेत्रीय चांचण्यांचे पुर्नविलोकन या बाबीअंतर्गत तपासणी करणे, बांधकामावरील बांधकाम साहित्यांची गुणवत्ता चाचणी करणे, व निरिक्षणे पुढील कार्यवाहीस्तव मंडळ कार्यालयास सादर करणे.

# कार्यपूर्तीचे वेळापत्रक, माहितीची सुलभता

**अ) कार्यपूर्तीचे वेळापत्रक :-** अधीक्षक अभियंता, दक्षता व गुणनियंत्रण मंडळ (सा.बां.) नागपुर कार्यालयाकडुन प्राप्त तक्रार अर्जावर कार्यवाही, माहीती अधिकारात प्राप्त अर्जावर कार्यवाही, बांधकाम साहित्यांची चांचणी करुन अहवाल निर्गमित करण्याची कार्यवाही परिशिष्ट "ब" मध्ये दिलेली आहे.

**ब) माहीतीची सुलभता :-** नागरीकांना प्रयोगशाळेशी सबंधीत संपूर्ण माहीती प्रयोगशाळेत उपलब्ध आहे व माहिती उपलब्धे बाबत प्रयोगशाळा कटीबध्द आहे.

**क) गा-हाणी/तक्रारी यांचे निवारण :-** नागरीक आपली गा-हाणी सहाय्यक संशोधन अधिकारी यांना प्रत्यक्ष भेटून, पत्राद्वारे किंवा ई-मेल द्वारे मांडु शकतात. त्यासाठी या कार्यालयाचा ई-मेल aronagpur.de@mahapwd.gov.in असा आहे व सा.बां. विभागाच्या संकेतस्थळावर पत्ता www.mahapwd.gov.in असा आहे.

## सनदेचा आढावा

नागरीकांचे सनदेच्या उपयुक्ततेबाबत व परिणामकारकतेबाबत मंडळ कार्यालयाचे निर्देशान्वये दरवर्षी आढावा घेण्यात येईल व त्याबाबतचा अहवाल मंडळ कार्यालयास सादर करण्यात येईल.

---

## सनदेची अंमलबजावणी व प्रतिसाद

नागरिकांच्या सनदेची अंमलबजावणी करण्यास प्रादेशिक प्रयोगशाळा (सा.बां.) नागपूर हे कार्यालय प्राधान्य देण्यास कटीबध्द आहे. सनदेस व्यापक प्रसिध्दी देवून, नागरिकांचे अभिप्राय/प्रतिक्रिया मागविण्यात येतील व त्यानुसार सनदेमध्ये आवश्यक ते बदल करण्यात येतील.

# परिशिष्ट – "अ"

अधीक्षक अभियंता
दक्षता व गुणनियंत्रण मंडळ (सा.बां.), नागपुर

↓

कार्यकारी अभियंता (दक्षता/गुणनियंत्रण),
दक्षता व गुणनियंत्रण मंडळ (सा.बां.), नागपुर

↓

सहाय्यक संशोधन अधिकारी,
प्रादेशिक प्रयोगशाळा (सा.बां.), नागपुर

↓

शाखा.अभि./स.अ. श्रेणी-२

↓

संशोधन सहाय्यक

↓

प्रयोगशाळा सहाय्यक

↓

कनिष्ठ लिपीक

↓

प्रयोगशाळा परिचर

↓

शिपाई

↓

चौकीदार

# परिशिष्ट – "ब"

| अ.क्र. | कार्यसूची | कार्यवाही करणारे अधिकारी | कार्यपूर्तीचा कालावधी |
|---|---|---|---|
| १ | प्रादेशिक प्रयोगशाळा (सा.बां.) नागपुर कडे मंडळ कार्यालयाकडुन प्राप्त तक्रारी अर्ज / चौकशी प्रकरणे बाबत अहवाल सादर करणे. | सहाय्यक संशोधन अधिकारी, प्रादेशिक प्रयोगशाळा (सा.बां.) नागपुर. | विहीत कालावधीत कार्यवाही |
| २ | माहीती अधिकार अधिनियम-२००५ अंतर्गत प्राप्त होणारे अर्ज. | जनमाहीती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता श्रेणी-२, प्रादेशिक प्रयोगशाळा (सा.बां.), नागपुर | विहीत कालावधीत कार्यवाही |
| ३ | बांधकाम साहित्यांची चांचणी करुन निष्कर्ष/ चांचणी अहवाल संबंधितास निर्गमित करणे. | सहाय्यक संशोधन अधिकारी , प्रादेशिक प्रयोगशाळा (सा.बां.), नागपुर. | चांचणीच्या प्रकारानुसार ७ ते ४५ दिवस |